" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

## विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

# अ ह वा ल

## लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्सव

बुधवार दिनांक 26 जून, 2024 रोजी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे कॉलेज प्रशासन, एनसीसी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महासज जयंती उत्सव संपूर्ण दिवसभरात तिहेरी स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आला.

सकाळी कॉलेजमध्ये कराड येथील प्रा.डॉ. ए जी थोरात व कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर आर कुंभार यांचे हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कॉलेजचे वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक, प्रबंधक श्री रघुनाथ जोग तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सुरुवातीला सकाळी 9 वाजता कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. हसनसो मुश्रीफ यांच्या उपस्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शोभा यात्रेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य, कोल्हापूर शहरातील सर्व शाळा- महाविद्यालयातील विद्यार्थी, एनसीसी कॅडेट सहभागी झाले होते. शोभा यात्रेची सुरुवात दसरा चौक, कोल्हापूर येथून होऊन संपूर्ण शहरभर शाहू महाराजांच्या कार्याचा जयजयकार करत स्वयंसेवक व इतर विद्यार्थी आपापल्या ठिकाणी निघून गेले. सदर शोभा यात्रेमध्ये सहभाग नोंदवल्यानंतर शाहू महाराजांच्या कार्याची जनसामान्यात ओळख व्हावी व त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा यांसाठी दिवसभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

त्यानंतर सकाळी 10 वाजता कॉलेजच्या वतीने शाहूंचे विचार या विषयावर डॉ. ए जी थोरात यांचे व्याख्यान आयोजित केले. आपल्या भाषणात थोरात सर म्हणाले की शाहू महाराज हे समाज क्रांतीचे प्रणेते होते. विचार हे सगळ्यांचं मोठं शस्त्र आणि संपत्ती आहे. शाहू विचार माणसाला सत्कर्म करायला भाग पाडतात. राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराने आपण वाटचाल केली पाहिजे. समतेचे,न्यायाचे आणि लोककल्याणाचे राज्य स्थापन करण्याचे महत्त्वाचे कार्य शाहू महाराजांनी केले. सदर व्याख्यान प्रसंगी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर आर कुंभारसर म्हणाले की निर्बलांचे रक्षण करण्याचे काम शाहू महाराजांनी शाहू महाराजांचे विचार गुरुदेव कार्यकर्त्यांनी समाजात रुजविण्याचे काम करावे हीच आजची शाहू महाराजांना मानवंदना आहे. या व्याख्यान कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थी तसेच एन एस एस व एन सी सी विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

दुपारी 2 वाजता लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून कॉलेज परिसरात राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, कॉलेजचे विद्यार्थी यांच्यावतीने कराड येथील प्राध्यापक डॉ.ए जी थोरात, प्राचार्य डॉ आर आर कुंभार सर यांचा हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न सदर कार्यक्रमासाठी प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

अशाप्रकारे संपूर्ण दिवसभरात शोभायात्रा, व्याख्यान व वृक्षारोपण असा तिहेरी कार्यक्रमाचे आयोजन करून शाहू जयंतीनिमित्त लोक राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा यथोचित गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम थाटामाटात यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर आर कुंभारसर यांचे मार्गदर्शन तसेच कॉलेजचे प्रबंधक श्री रघुनाथ जोग, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले.

श्री एल एस नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ.आर आर कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# लोकराजा रा. छ. शाहू महाराज जयंती

दि. 26.06.2024




